मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शनिवार, दि. 18 मे 2024 | पान- 1


# महापालिकेकडून अनधिकृत होर्डिंग सर्वेक्षण सुरू

## शहरातील अनधिकृत होर्डिंग सोमवारपासून काढणार : आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील अनधिकृत होर्डिंगचे सर्वेक्षण सुरू केले आहे. येत्या दोन दिवसात हे सर्वेक्षण पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर त्या अनधिकृत होर्डिंगवर सोमवारपासून (२० मे) आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून कारवाई करण्यात येईल, अशी माहिती उपायुक्त संदीप खोत यांनी दिली.

अनधिकृत होर्डिंग कोसळून होणाऱ्या अपघातांचा संभाव्य धोका लक्षात घेता महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून तत्काळ शहरामध्ये सर्वंकष सर्वेक्षणास बुधवारपासून (१५ मे) सुरुवात करण्यात आली. महापालिकेच्या आठ झोनमध्ये परवाना निरीक्षकांद्वारे शुक्रवारपर्यंत दोन दिवसीय सर्वेक्षण पूर्ण करण्यात येणार आहे. सर्वंकष सर्वेक्षणासाठी नोडल अधिकारी म्हणून संदीप खोत हे स्वतः देखरेख करत असून अनधिकृत होर्डिंगवर



तत्काळ कारवाई करणार आहेत. तसेच आकाशचिन्ह व परवाना विभागाने शुक्रवारी (१७ मे) होर्डिंग चालक, मालकांची पुन्हा एकदा महत्त्वपूर्ण बैठक बोलावली असून सर्वेक्षणाच्या निष्कर्षांवर विचार करण्यासाठी होर्डिंग मालकांना बैठकीसाठी बोलवण्यात आले आहे.

दरम्यान, या सर्वेक्षणात होर्डिंगचे आकारमान हे प्रत्यक्ष आणि मंजूर किती आहे. होर्डिंगची जमिनीपासून उंची, एकूण अधिकृत आणि अनधिकृत होर्डिंग किती, होर्डिंगच्या जागेची मालकी, चालक कोण आहे. सर्वेक्षणामध्ये होर्डिंग्ज कायदेशीर स्थितीचे मूल्यांकन, कोणत्याही प्रलंबित कायदेशीर कारवाईची छाननी, होर्डिंग मालकांचा तपशील तपासणी, होर्डिंगच्या स्ट्रक्चरल स्थिरता प्रमाणपत्रांची पडताळणी, अनधिकृत होर्डिंगमुळे उद्भवणाऱ्या संभाव्य रहदारी अडथळ्यांचे मूल्यांकन करण्यासाठी सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. यामध्ये होर्डिंगचे ठिकाण /पत्ता व त्याचे मंजूर व प्रत्यक्षात असलेले आकारमान तपासण्यात येणार आहे. त्याबरोबरच होर्डिंगची जमिनीपासूनची उंची, होर्डिंग अधिकृत आहे की अनधिकृत, होर्डिंगला पत्रा लावण्यात आला आहे की नाही, वाहतुकीस अडथळा देणारे होर्डिंग, कोर्टामध्ये दावा सुरू असलेले होर्डिंग व त्याची रचना पूर्ण आहे की अपूर्ण, ही माहितीही सर्वेक्षणाच्या माध्यमातून तपासण्यात येणार आहे. तसेच महापालिका हद्दीत रेल्वे स्टेशन आणि त्यांच्या हद्दीत असणा-या होर्डिंगचीदेखील तपासणी करण्यात येईल. हे होर्डिंग अधिकृत आहेत का, याची खातरजमा करण्यात येईल. अनधिकृत असतील त्या होर्डिंगवर कारवाई करण्यासाठी रेल्वेच्या संबंधित अधिकाऱ्यांना पत्र देऊन कारवाई करण्यात येईल, असेही खोत यांनी सांगितले.

### '191' अनधिकृत होर्डिंगवर कारवाई

**» किवळे येथील होर्डिंग दुर्घटनेनंतर मागील एक वर्षभरात १९१ अनधिकृत होर्डिंग निष्कासित करण्याची कारवाई करण्यात आली. त्यानंतर महापालिका हद्दीतील आणखी होर्डिंग असतील त्यांचे सर्वेक्षण करून त्यावर देखील लवकरच कारवाई केली जाईल.**

> शहरातील होर्डिंगबाबत संभाव्य जोखीम ओळखून सर्वंकष सर्वेक्षण महत्त्वाचे आहे. शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी होर्डिंगबाबतची माहिती संकलित करण्यासाठी सदर सर्वेक्षण करण्यात येत आहे. या सर्वेक्षणास मालक व संबंधितांनी सहकार्य करावे. त्याचबरोबर शहरातील अनधिकृत होर्डिंगधारक मालकांनी दोन दिवसांमध्ये आपले अनधिकृत होर्डिंग काढून अपेक्षित उपाययोजना करण्यात याव्यात.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# पिंपरी-चिंचवडकरांवर पाणी कपातीचं संकट

## मावळातील पवना धरणात आजमितीला 28.93 टक्के पाणीसाठा : जूनअखेरपर्यंत पुरेल एवढाच हा साठा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडकरांवर पाणी कपातीचे संकट निर्माण झाले आहे. शहरवासीयांची तहान भागविणाऱ्या मावळातील पवना धरणात आजमितीला २८.९३ टक्के साठा असून जूनअखेरपर्यंत पुरेल एवढाच हा साठा आहे. गेल्यावर्षीपेक्षा कमी पाणीसाठा असल्याने पावसाने ओढ दिल्यास शहरवासीयांवार पाणी कपातीचे संकट ओढावण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पिंपरी-चिंचवडला पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मागील साडेचार वर्षांपासून एकदिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. शहराचा लोकसंख्यावाढीचा वेग आणि भविष्यातील सन २०४५ पर्यंतची लोकसंख्या विचारात घेऊन पालिका आंद्रा व भामा आसखेड धरणातून २६७ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी आणणार आहे. त्या पाण्यावरील प्रक्रियेसाठी चिखलीत जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात आले आहे.



आंद्रा धरणातून निघोजे येथील बंधाऱ्यातून पाणी उचलून समाविष्ट भागातील नागरिकांना देण्यात येत आहे. परंतु, वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत असून, तक्रारींमध्ये वाढ होत आहे. पवना धरणात सध्या २८.९३ टक्के पाणीसाठा असून हा साठा जूनअखेरपर्यंत पुरेल एवढा आहे. गेल्यावर्षी आजच्या तारखेला ३०.९२ टक्के पाणीसाठा होता. मागीलवर्षीपेक्षा दोन टक्क्यांनी पाणीसाठा कमी आहे.

भामा-आसखेड धरणातून पाणी आणण्यासाठीच्या जलवाहिनीचे काम सन २०२५ पर्यंत पूर्ण होईल. तोपर्यंत पाणीपुरवठा एकदिवसाआडच सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

धरणात २८.९३ टक्के पाणीसाठा आहे. पावसाला विलंब झाल्यास पाणी टंचाईला सामोरे जावे लागू शकते. शहरी भागात पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पवना धरणाचे शाखा अभियंता रजनीश बारिया यांनी केले. तर, विस्कळीत पाणीपुरवठ्याबाबत काही तक्रारी नाहीत. जूनमध्ये तक्रारी वाढू शकतील. पाणीपुरवठा विस्कळीत झाला तरच टँकरद्वारे पाणी दिले जाते. जास्तीचे पाणी लागते म्हणून खासगी गृहनिर्माण संस्था टँकरद्वारे पाणी घेतात.

# पालखीच्या स्वागताला ध्वनिवर्धक नको

## सुरक्षित आणि हरित पालखी सोहळ्यासाठी सूक्ष्म नियोजन करा : जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी पाणी, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था, रस्ते, रस्ता सुरक्षा, आरोग्य सुविधा आदी सर्व सोयी सुविधा योग्य पद्धतीने उपलब्ध करून देण्यासह सुरक्षित आणि हरित पालखी सोहळ्यासाठी सर्व यंत्रणांनी आतापासून सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थान आणि संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान पालखी सोहळ्याबाबत पूर्वतयारी आढावा बैठक डॉ. दिवसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आदी उपस्थित होते.

यंदा वेळेवर पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला असल्याचे सांगून डॉ. दिवसे म्हणाले, पावसाची स्थिती लक्षात घेऊन आवश्यक सुविधा करण्यात याव्यात. पावसाळा लक्षात घेता स्वच्छता आणि आरोग्याचा परस्पर संबंध असल्याने तात्पुरत्या शौचालयाच्या स्वच्छतेवर विशेष लक्ष द्यावे. स्वच्छतेच्या नियोजनासाठी स्वतंत्र नियंत्रण अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी.

पालखी सोहळा जगातील सर्वात शिस्तबद्ध असणारा सोहळा आहे. आपण अशा सोहळ्याचे भागीदार आहोत या भावनेने सोहळ्यासाठी आपले योगदान द्यावे. पालखीला टँकरने पाणीपुरवठा होणाऱ्या सर्व स्रोतांची तपासणी करावी. आवश्यक ती निर्जंतुकीकरणाची औषधे, दवाखान्यांमध्ये औषधे उपलब्ध ठेवावीत. पाणीपुरवठ्याचे टँकर आणि शौचालयांच्या संख्येत वाढ कण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. पालखीच्या रस्त्यावर कोठे अतिक्रमणे असल्यास ती तात्काळ काढून टाकण्यात यावीत. आपत्कालीन व्यवस्थेसाठी नगरपालिकेकडील



लायटिंग टॉवरचा उपयोग पालखी दरम्यान करण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

आरोग्य आणि स्वच्छतेशी संबंधित कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेऊन याबाबत आदर्श कार्यपद्धती तयार करावी. वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात यावी. शहरातील स्वच्छता आणि आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात यावी. त्यासाठी शहरातील तज्ज्ञ डॉक्टरांची बैठक घेऊन त्यांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेच्यावतीने करण्यात आलेल्या नियोजनाची यावेळी सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली. स्वच्छता, पिण्याचे शुद्ध पाणी, तात्पुरते शौचालय, आरोग्य तपासणी, पालखी तळाचे सपाटीकरण, इंधन आणि वीज पुरवठा, शोषखड्डे, तात्पुरता निवारा केंद्र, आरोग्य किट आदींची माहिती यावेळी देण्यात आली.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी १ हजार ५००, संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी १ हजार आणि संत सोपान महाराज पालखी सोहळ्यासाठी २०० शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे. १४० रुग्णवाहिका आणि ५७ रुग्णवाहिका पथक, ११२ वैद्यकीय अधिकारी, ३३६ आरोग्य अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्यासाठी २०० टँकरची व्यवस्था करण्यात येणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी महानगरपालिका, संबंधित उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी यांच्यासह भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, अन्न व औषध प्रशासन, महावितरण आदी विभागांकडून पूर्वतयारीचा आढावा घेतला.

### मैलामिश्रीत पाणी नदीत सोडू नये

**» आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी ध्वनिवर्धक लावले जातात. त्यामुळे भक्तीमय वातावरणावर परिणाम होत असून वारकऱ्यांना आवाजाचा त्रास होत आहे. तसेच पालखी मार्गांच्या ठिकाणावर सुरू असणाऱ्या विकास कमांचा राडारोडा काढणे, इंद्रायणी नदीत जलपर्णी काढावी, मैलामिश्रीत पाणी नदीत सोडू नये.**

# फुरसुंगी-उरुळी देवाची गावकऱ्यांचा जीव धोक्यात

## परिसरात 84 अनधिकृत होर्डिंग : स्वतंत्र नगरपरिषदेच्या घोषणेमुळे महापालिका करेना कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

मुंबईतील घाटकोपरमध्ये होर्डिंग कोसळल्याने राज्यातील होर्डिंगच्या आसपास राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. घाटकोपरमधील घटनेच्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने होर्डिंगचा आढावा घेतला. त्यानुसार हडपसर भागातील फुरसुंगी-उरुळी देवाची गावात ८४ होर्डिंग अनधिकृत असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र या दोन गावांसाठी स्वंतत्र नगर परिषदेची घोषणा केल्यामुळे पुणे महापालिकेकडून कारवाई करण्यात आली नसल्याचे प्रशासनाने मान्य केले आहे.





नगर परिषदेच्या घोषणेमुळे या गावातील नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे.

महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागाने गतवर्षी किवळे येथे होर्डिंग कोसळल्याच्या घटनेनंतर अनधिकृत होर्डिंगवर कारवाई तीव्र केली होती. यावेळी विविध विभागातील एकूण १ हजार ५६४ अनधिकृत होर्डिंग काढण्यात आले. मात्र, महापालिका हद्दीत समाविष्ट फुरसुंगी व उरुळी देवाचीसाठी स्वतंत्र नगर परिषद स्थापन करण्याची घोषणा झाल्याने तेथील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई झाली नाही. या भागात आजही ८४ अनधिकृत होर्डिंग आहेत. या दोन गावांसाठी स्वतंत्र नगर परिषद स्थापनेची घोषणा झाली असली तरी ही गावे महापालिका हद्दीत असल्याचे प्रतिज्ञापत्र राज्य सरकारने सादर केले आहे. त्यामुळे या गावांचा कारभार महापालिकेकडून सुरू आहे. असे असले तर होर्डिंगवर कारवाईचे अधिकार का नाहीत, असा प्रश्न नागरिक विचारत आहे.

### होर्डिंगना नोटीस

महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी बुधवारी, १५ मे रोजी जंगली महाराज ते अलका चौक दरम्यानच्या होर्डिंगची पाहणी केली होती. अनेक होर्डिंग्ज धोकादायक पद्धतीने लावल्याचे उघड झाले. याची चौकशी करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले होते. त्यानुसार अलका चौक, खंडोजी बाबा चौकातील स्ट्रक्चरल ऑडिट केलेल्या होर्डिंगलाही नोटीस पाठवली आहे.

### कारवाईतून 46 कोटी तिजोरीत

**» महापालिकेने गेल्या वर्षी बेकायदा होर्डिंगवर कारवाई केली होती. शहरात एकूण २ हजार ५९८ अधिकृत होर्डिंग आहेत. एकूण १८०० हून अधिक अनधिकृत होर्डिंग्ज आहेत. त्यावेळी एकूण १५६४ अनधिकृत होर्डिंग्ज काढली. २५० हून अधिक होर्डिंगला परवाना मिळाला आहे. या कारवाईमुळे पालिकेच्या तिजोरीत सुमारे ४६ कोटी रुपये जमा झाले.**

# महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्तीचे कामांना वेग

## महावितरण पिंपरी चिंचवड विभाग अंतर्गत देखभाल दुरुस्तीची 80 टक्के कामे पुर्ण : युद्ध पातळीवर कामे सुरू

**पिंपरी | प्रतिनिधी**

महावितरणकडून पिंपरी चिंचवड शहरासह ग्रामीण भागात सुरु असलेल्या वीजयंत्रणेच्या मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्तीची कामे पूर्णत्वाकडे आहेत. येत्या पावसाळ्यात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी ही कामे सुरु करण्यात आली आहेत.

महावितरण पिंपरी चिंचवड शहराअंतर्गत पिंपरी, चिंचवड, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, काळेवाडी, हिंजवडी, पुनावळे, ताथवडे, वाकड इत्यादी भाग येत असून या सर्व ठिकाणी मान्सून पूर्व देखभाल व दुरूस्तीची कामे युध्द पातळीवर करण्यात येत आहेत.

पावसाळ्यात वीजपुरवठा खंडित होण्याचे संभाव्य धोके टाळण्यासाठी महावितरणकडून दरवर्षी देखभाल व दुरुस्तीचे कामे केली जातात. यात प्राधान्याने विविध कामांचा समावेश आहे. उपरी वीजवाहिन्यांना स्पर्श करणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडूणे, तुटलेले पीन व डिस्क इन्सूलेटर्स बदलणे, वितरण रोहित्रांचे, खांबांचे, उपकेंद्रातील उपकरणांचे पूर्ण अर्थिंग तपासणे व तुटलेल्या अर्थवायर पूर्ववत करण्याचे काम होत आहे.

ऑईल फिल्टरेशन, उपकेंद्रातील ब्रेकर्सची दुरुस्ती, फ्यूज बदलणे, भूमिगत केबल टाकणे, खांब आणि तारांचे मजबुतीकरण, वाकलेले किंवा गंजलेले वीज खांब, उच्चदाब व लघुदाब वीजवाहिन्यांना आवश्यकतेनुसार गार्डस् पुरवणे, तारांमधील झोल काढण्याचे काम केली जात आहेत.

पावसाचे पाणी साचणाऱ्या परिसरातील फिडर पिलरची जमिनीपासून उंची वाढविणे, लघुदाब वितरण पेटीची दुरुस्ती, दरवाजा नसल्यास लावणे आदी काम केली जात आहेत. झाडांच्या फांद्या छाटणीसाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची मदत घेतली जात आहे.

दरवर्षी पावसाळ्यात ही कामे केली जातात. महावितरण पिंपरी चिंचवड विभाग अंतर्गत देखभाल दुरूस्तीची ८० टक्के कामे पार पडलेली असून उर्वरीत कामे ही येत्या दहा दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहेत. सर्व शाखा अभियंते व उपविभागीय अभियंता कामावर देखरेख ठेवत आहेत.



> ओव्हरहेड वायर असल्याने वीजपुरवठा सुरळीत रहावा व वीजसुरक्षा या दोन बाबी लक्षा घेऊन सर्व कामांची देखभाल दुरुस्ती केली जात आहे. ३१ मे पर्यंत सर्व कामे पूर्ण होतील.
>
> **- निशिकांत राऊत, जनसंपर्क अधिकारी, महावितरण.**

### वीजपुरवठा खंडित होण्याची काही कारणे

**» खराब झालेले डिस्क व पीन इन्सूलेटरमध्ये पाणी गेल्यास, खोदाकाम करताना भूमिगत वाहिन्यांमध्यो दोष निर्माण होणे, पावसामुळे केबलमधील आर्द्रता येणे, वीज यंत्रणेवर झाडे कोसळणे, मोठ्या फांद्या तुटून पडणे, वीज कोसळणे किंवा तिच्या कडकडाटाने दाब वाढणे आदींमुळे वीजपुरवठा खंडित होतो. फिडर पिलर, रिंगमेन युनिट आदी यंत्रणेत पाणी शिरते. त्यामुळेही वीजपुरवठा खंडित होतो.**

---

# अवकाळीच्या सावटाखाली मशागतीच्या कामाने घेतला वेग

## मावळमध्ये आधुनिक पद्धतीचा वापर : ट्रॅक्ट्ररद्वारे नांगरणीसाठी एकरी दोन हजार रूपये खर्च

**पिंपरी | प्रतिनिधी**

खरीप हंगाम तोंडावर आल्यामुळे शिवारातील पेरणीपूर्वीच्या मशागतीच्या कामाला वेग आला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर, नवनवीन बी बियाणे, शेणखत, रासायनिक खतांचा वापर, आधुनिक तंत्रज्ञानयुक्त लागवड पद्धतीचा वापर करून आपल्या आर्थिक उत्पादनात कशी वाढ करता येईल, या आशेने परिसरातील शेतकऱ्यांनी अवकाळीच्या सावटातच मशागतीच्या कामांना सुरुवात केली आहे. मावळ तालुकयात ट्रॅक्टरद्वारे नांगरणीसाठी एकरी दोन हजार रुपये खर्च येत आहे.

बैल जोडीच्या मदतीने अनेक शेतकरी आपल्या शेतीची मशागत करतात. मात्र ज्यांच्याकडे बैल जोडी नाही, त्यांना बैलजोडीचा शोध घ्यावा लागतो. शिवाय बैलजोडीने मशागत करताना अधिक वेळ लागत असतो. त्यामुळे ट्रॅक्टरने शेतीची मशागत केली जात आहे. नांगरणी खोलवर होते. त्यामुळे शेतकऱ्यांचा कल ट्रॅक्टरद्वारे जमिनीची मशागत करण्यावर दिसून येतो.

उन्हाळ्याच्या दिवसात गेल्या काही दिवसांपासून अवकाळीमुळे अगदी पावसाळ्याचा “फील” येत आहे. अवकाळी पावसाच्या सावटातच शेतकरी नव्या जोमाने खरीप हंगामाच्या तयारीला लागलेले आहेत. शेतीची मशागत केली जात आहे. शेतातील काडी-कचरा उचलून जमिनी तयार करण्यात येत आहेत. तसेच खतांची व्यवस्था देखील शेतकरी करीत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून गारपीट, वादळवारा व अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेती मशागतीची कामे बऱ्याच प्रमाणात खोळंबलेली होती. परिणामी आंदर मावळ, नाणे मावळ आणि पवन मावळ परिसरातील शिवारात पेरणीपूर्व मशागतीला शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा सुरुवात केली आहे.

मावळ तालुक्यातील खरिप हंगामातील पिकांवर अवलंबून असणारे कोरडवाहू शेतकरी तसेच सिंचन व्यवस्था असलेल्या शेतकऱ्यांची रब्बी पिकांच्या काढणीची सर्व कामे पूर्ण झाली. नेहमीप्रमाणे मृग नक्षत्रात पावसाचे आगमन झाले की पेरणीला सुरुवात होते.

यासाठी जरी एक महिन्याचा कालावधी शिल्लक असला तरी सुद्धा लग्नसराईचा हंगाम व मजुरांचा तुटवडा यामुळे शेतकरी आता रखरखत्या उन्हातही खरीप पेरणीसाठी मशागतीच्या कामात व्यस्त दिसून येत आहे.

नैसर्गिक आपत्ती आणि शेतमालाच्या घसरत्या दरामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती आधीच खालावलेली आहे. यातच लग्नसराईचा हंगाम सुरू आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पिके पेरणीसाठी धावपळ होऊ नये यासाठी शेतकरी आतापासूनच शेतजमिन मशागतीच्या कामाकडे वळलेले दिसत आहे.



### बैलाच्या दावणी रिकाम्या

**» पारंपारिक पद्धतीने शेतीची नांगरट आता काळाच्या पडद्याआड गेली आहे. त्यासाठीच्या बैलजोड्या देखील फार कमी दिसतात. पूर्वी एका शेतकऱ्याच्या दावणीला एक किंवा दोन जोड्या बैल असायचे. बदलती शेती आणि महागाईमुळे बैलजोड्या टिकविणे जिकिरीचे होऊन बसले आहे. परिणामी ट्रॅक्टरची संख्या वाढली आणि शेतकऱ्यांकच्या दारातील दावणी रिकाम्या झाल्या. त्यामुळे एकप्रकारे ग्रामीण संस्कृतीला घरघर लागली आहे.**

# खेड, हवेलीतील शेतकऱ्यांना लागली लॉटरी

## हवेली आणि खेड तालुक्यातील जमिनींच्या संपादनाबाबत निवाडा जाहीर : 15 गावांसाठी 541 कोटी रुपये



**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) प्रस्तावित केलेल्या वर्तुळाकार रस्त्याच्या पूर्व मार्गातील हवेली आणि खेड तालुक्यातील जमिनींच्या संपादनाबाबत निवाडा जाहीर करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी २७ फेब्रुवारी रोजी सादर झालेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी राज्याचे वित्तमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी साडेदहा हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यांपैकी हवेली आणि खेडमधील १५ गावांसाठी ५४१ कोटी रुपये जिल्हा प्रशासनाने निश्चित केले. या प्रकल्पाच्या भूसंपादनाला वेग आला आहे.


पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी रस्ते महामंडळाकडून १७२ किलोमीटर आणि ११० मीटर रुंदीचा वर्तुळाकार रस्ता प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग करण्यात आले आहेत. पूर्व मार्गातील मावळ तालुक्यातून ११, खेड १२, हवेली १५, पुरंदरमधील पाच आणि भोरमधील तीन गावांतून प्रस्तावित आहे, तर पश्चिम मार्गावरील भोर तालुक्यातील एक, हवेली ११, मुळशी १५ आणि मावळ तालुक्यातून सहा गावे बाधित होणार आहेत. पश्चिम मार्गावरील ३४ पैकी ३१ गावांमधील ६४४ हेक्टर जमिनीच्या संपादनाचे काम पूर्ण झाले आहे. त्यासाठी २९७५ कोटी रुपये मोबदला दिला आहे.

भोर तालुक्यातील पाच गावे वगळून शिवरे गावाचा समावेश झाल्याने या गावातील मूल्यांकनाचे दरनिश्चितीचे काम आचारसंहितेपूर्वी सुरू करण्यात आले होते. पश्चिम मार्गाच्या भूसंपादनासाठी यापूर्वीच गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळाकडून (हुडको) दहा हजार कोटींचे कर्ज घेण्यात आले आहे. या माध्यमातून पश्चिम मार्गाचे बहुतांश भूसंपादन मार्गी लागले आहे. पूर्व मार्गाच्या भूसंपादनासाठी रस्ते महामंडळाला निधीची गरज होती. त्यानुसार महामंडळाने राज्य सरकारकडे निधीची मागणी केली होती. त्यानुसार राज्याचे उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री पवार यांनी अंतरिम अर्थसंकल्पात वर्तुळाकार रस्त्याच्या भूसंपादनासाठी तब्बल दहा हजार ५१९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

या गावातील निवाडे जाहीर जिल्हा प्रशासनाकडून या प्रकल्पाच्या पूर्व मार्गातील खेड आणि हवेली तालुक्यातील जमिनींच्या संपादनाबाबत निवाडा जाहीर करण्यात आला आहे. हवेली तालुक्यातील मौजे बिवरी, गावडेवाडी आणि वाडेबोल्हाई, तर खेड तालुक्यातील सोळू, निघोजे, मोई, मरकळ, कुरुळी, खालुंब्रे, केळगाव, गोळेगाव, धानोरे, चिंबळी, चऱ्होली आणि आळंदी या गावांचा समावेश आहे. हवेली तालुक्यातील गावांसाठी ६४ कोटी २९ लाख रुपये, तर खेड तालुक्यातील गावांसाठी सुमारे ४७६ कोटी ७२ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

# पुण्यात उकाडा वाढण्याची शक्यता

## पुणे शहर आणि परिसरात मान्सूनपूर्व पावसाचा प्रभाव कमी : उन्हाचा चटका पुन्हा एकदा वाढला




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहर आणि परिसरात मान्सूनपूर्व पावसाचा प्रभाव कमी झाला असला तरी उन्हाचा चटका पुन्हा एकदा वाढू लागला आहे. गेल्या तीन दिवसांपासून शहराच्या कमाल तापमानात सातत्याने वाढ होत असून 37.7 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. ढग निरभ्र झाल्याने पुढील तीन दिवस कमाल तापमान 40 अंश सेल्सिअसच्या आसपास राहील, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

शनिवारी (11 मे) व रविवारी (12) शहरात जोरदार पाऊस झाला. परिणामी, शहराचे कमाल तापमान - जे पूर्वी 40 अंश सेल्सिअसपेक्षा जास्त होते - 31 अंश सेल्सिअसपर्यंत घसरले. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पावसाने शहरवासियांना काहीसा दिलासा दिला होता, मात्र तापमानात पुन्हा एकदा वाढ झाली. लोहगाव येथे 36 अंश सेल्सिअस, तर शिवाजीनगर येथे 37.5 अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

शहर व परिसरात गुरुवारी 16 मेला दुपारपर्यंत प्रामुख्याने आकाश निरभ्र होतं, ढगाळ वातावरण होतं. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी ( 17 मे) आणि शनिवारी (18 मे) पुण्यात कमाल तापमानात 39 अंश सेल्सिअसपर्यंत वाढ होईल, तर रविवारी (19 मे) तापमान 40 अंशसेल्सिअसपर्यंत पोहोचेल.

### राज्यातलं वातावरण कसं असेल?

» पुढील 24 तासात राज्यात विविध भागात पावसाची शक्यत वर्तवण्यात आली आहे. तर काही भागात उष्णतेच्या लाटेला इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, रायगड, रत्नागिरीमुळे तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. याशिवाय सिंधुदुर्गात जोरदार पावसाची शक्यता असून जिल्ह्याला अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, जळगाव, नाशिकमध्येही अवकाळी पावसाची हजेरी लागण्याची शक्यता आहे. अहमदनगर, कोल्हापूर, सांगली, सोलापूर या जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह मुसळधार अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुणे, सातारा, नाशिक, जळगावमध्ये पावसाच्या रिमझिम सरी पाहायला मिळतील. काल कोकणातील रायगड, सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाच्या सरी कोसळल्या होत्या. तर मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाचा जोर पाहायला मिळाला. साताऱ्याच्या महाबळेश्वरमध्येही मान्सूनपूर्व पावसाच्या सरी कोसळल्यात. तर पंढरपुरातही विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली होती.